'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
ISSN : 2348-7143 (Online)
Vol. 2 Issue. 2 April-June - 2015

# समर्थ रामदास आणि संगीत साधना

**डॉ. विनोद गोरवाडकर,**
समाजश्री प्रशांतदादा हिरे कला, -
विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
नामपूर, जि. नाशिक.
मो. ९४२३४७७२७३

**म**राठी माणूस मोठाच भाग्यवान म्हटला पाहिजे की, ज्याला असंख्य वैभवशाली परंपरांचं पुर्वापार चालत आलेलं लेणं आपोआप मिळालं. या प्रांतात अनेक परंपरा चालत आल्या, चालत आहेत आणि यापुढेही त्या तशाच चालत राहतील. त्या साऱ्या परंपरामध्ये मराठी संतांची जी परंपरा या भूमीवर काहीशे वर्षापूर्वी – काहीशे वर्षापर्यंत चालली ती केवळ अजोड आहे. जगाच्या पाठीवर असा कुठलाही प्रदेश नसेल, जेथे महाराष्ट्त जेवढ्या संख्येने संत निर्माण झालेत, तेवढे झाले असतील. या भूमीला पवित्र करण्याचं आणि भूमीवरच्यांना सुजाण करण्याचं महत्त्वपूर्ण कार्य मराठी संतांनी केलं आणि तेही कुठल्याही संप्रदायात न अडकता, कुठल्या पंथात न अडकता, कुठल्याही धर्मात न गुंतता. समाजाविषयी विलक्षण कळवळा. अज्ञानी जनांच्या बुद्धीवर पसरलेली अविद्येची जळमटे दूर करण्याची तीव्र तळमळ आणि त्यापोटी मनीमानसी अगदी आतून निर्माण झालेला समाजप्रबोधनाचा निर्मळ झरा ही संतांची प्रमुख लक्षणे होती.

सातव्या शतकात संतश्रेष्ठ ज्ञानदेव झाले. त्यानंतर शिवरायांचा स्वराज्याचं तोरण बांधलं जात असतांनाच मराठी मुलखात दोन संत आपल्या नेतृत्वाने, आपल्या कर्तृत्वाने आपल्या कार्याच्या धवल पताकेने झळाळत होते. ते म्हणजे जगृतगुरु तुकोबा आणि दुसरे समर्थ रामदास ! दोघांचे पिंड वेगवेगळे पण कार्य मात्र एकच समाजजागृतीचे !

बाराव्या वर्षी स्वतःच्या लग्नातून रामदास पळालेले चोवीसाव्या वर्षापर्यंत म्हणजे तब्बल एक तपापर्यंत टाकळीला राहून तपोसाधना करीत राहिले आणि चोवीसाव्या वर्षापर्यंत देशभ्रमणाला निघून छत्तीसाव्या वर्षी सर्वज्ञानी असे समर्थ बनले. समर्थांचे सारे जीवनचरित्रच मोठे विलक्षण आहे यात शंका नाही.

समर्थ रामदास थोर संत होते. अधिकारी पुरुष होते. ज्ञानी होते, भक्तीमार्गात लीन झालेले परम ईश्वरभक्त होते. प्रपंचाविषयीची पुरेपुर जाण असणारे, वैराग्य अंगी कसे बाणवावे याचे भाण असणारे योगी होते, पण या साऱ्या सोबतच त्यांना संगीताचे विलक्षण ज्ञान होते. समर्थ रामदास, रामदासांचे साहित्य आणि संगीत यांची एकमेकांमध्ये असणारी गुंतवणूक पाहिली की, समर्थांना संगीताविषयी किती प्रगाढ ज्ञान होते याची पुरेपूर कल्पना आल्याशिवाय रहात नाही.

**संगीताचे सामर्थ्य मान्य :-**

आपल्या अध्यात्माचा आणि भक्तीमार्गाच्या वाटचालीत संगीताला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे हे रामदासांनी पूर्णतः ओळखले होते आणि म्हणूनच प्रत्येक मठपती वा महंत हा संगीत, नृत्य, नाट्य या त्रयीचे उत्तम ज्ञान असणारा कीर्तनकार असलाच पाहिजे हा त्यांचा नियम होता.

संगीताची जाण असणंही आवश्यक आणि कीर्तनकार म्हणवून घेण्यासाठी त्यामध्ये बहुश्रृतपणा, चतुरस्त्रता, व्युत्पन्नता, वेगवेळ्या शास्त्रांची चौफेर माहिती, देशोदेशी चाललेल्या विविध विषयांचा धांडोळा घेऊन मिळालेले ज्ञान या साऱ्या गोष्टी त्यामध्ये समर्थांनी अनिवार्य ठरवल्या होत्या.

संगीतकलेचे सर्वश्रेष्ठ स्थान समर्थांनी साहित्य आणि कला यांच्या कीर्तन या प्रसारमाध्यमात समर्थांनी राबविले आहेच तथापि भक्तीमार्गाद्वारे परमार्थप्राप्ती करुन घेत असतांना संगीतासारखीशुद्ध आणि सर्वश्रेष्ठ कला कशी जनसामान्यांना सहाय्यभूत ठरते या विषयीचेही त्याचे विचार महत्त्वपूर्ण वाटल्याशिवाय रहात नाही.

**धन्य ते गायनी कळा :-**

लोकसमूहाच्या मुखी सहज बसतील असे शब्द लिहून, सहज म्हणता येतील अशा चाली लावण्याचे कसब समर्थांच्या अंगी पुरेपूर होते आणि त्याचे प्रतीक त्यांच्या पद्य वाङ्‌मयात वेळोवेळी उमटलेले सुस्पष्टपणे दिसते.

संगीत कलेविषयी समर्थांना विलक्षण ओढा, आवड आणि आदरही होता. तीन साडेतीनशे वर्षापूर्वी समर्थांनी संगीत कलेला दिलेले उच्च स्थान महत्त्वपूर्ण वाटल्याशिवाय रहात नाही. समर्थांच्या मते संगीतकला ही सर्व कलात अधिक भाववाही आहे, श्राोत्यांच्या मनाची पकड घेणारी, मनाच्या आतमध्ये पोहचणारी, एवढेच नव्हे तर श्रोत्यांना अंतःर्मुख करणारी अशी ही विलक्षण कला आहे. सर्व कलांमध्ये संगीत कलेचे अधिष्ठान असल्याशिवाय रहात नाही. किंबहूना नादब्रह्माकडून परब्रह्माकडे तिची वाटचाल सुरु असते. मनाला शुद्ध करणाऱ्या एकाग्र करणाऱ्या या कलेविषयी समर्थांना किती जिव्हाळा होता त्याचे प्रतीक त्यांच्या या काव्यात सुस्पष्टपणे दिसते.

**‘संगीत गायनाची विद्या ।**
**सर्व विद्या मनोरम ।**
**विदेह पाहता नाही ।**
**धन्य ते गायनी कळा**
**आवडी सकळ लोका ।**
**प्रीतीने भजती जना**
**इच्छीले पुरविती सर्वे ।**
**धन्य ते गायनी कळा ।।**
**वेधीला सर्वही चित्ते बोधिली लोक भाविके**
**अद्‌भुत गुज देवाचे ।**
**धन्य ते गायनी कळा ।।**
**येकाळी महंती येते ।**
**उदंड किर्ती वाढते ।**
**विख्यात सकळे लोकी ।**
**धन्य ते गायनी कळा ।।**
**राहती लोक ते राजी ।**
**आवडी उपजे मनी**
**वर्णिता किर्ती देवाची ।**
**धन्य तो गायनी कळा ।।**
**दुसरी भक्ती देवाची ।**
**जगोद्धारांची होईजे ।**
**घमंड माजते मोठे ।**
**धन्य तो गायनी कळा ।।**
**बारीक उडती किळा ।**
**नाना तंत परोपरी ।**
**ऐकता गुदगुल्या होती ।**
**धन्य ते गायनी कळा ।।**
**बालके श्वापदे पक्षी ।**
**लोथती वेधती मनी ।**
**चित्त निश्‍चिंत होता हे ।**
**धन्य ते गायनी कळा ।।**

धन्य ते गायनी कळा या काव्यातून समर्थांना वाटणारे संगीतविषयक प्रेम सिद्ध होते आणि संगीतामुळे आत्मोद्धार तर होतोच होतो पण जगोद्धारही झाल्याशिवाय रहात नाही. त्यामुळे संगीत हा एक देवाचाच अदभूत गुण ठरतो हे समर्थांचे संगीताविषयीचे मत तत्काळ पटते.

संगीत कलेचा समर्थांनी अत्यंत बारकाईने विचार केलेला आपल्याला दिसून येतो. प्राचीन काळातली जगरहाटी ही धर्माच्या चौकटीत बद्ध केलेली होती. त्यामुळे धर्मसंबद्ध असणाऱ्या चाकोरीत प्रत्येक कृती ही देवधर्माच्याच साक्षीने होत होती. तेव्हा या काळात बहुतांशी सर्व कला देवालयाच्या, मठ–मंदिराच्या सहाय्यानेच वाढीस लागल्या आणि एक वेगळी चौकटच कलेच्या बाबतीत कलातंत्राच्या बाबतीत सुनिश्चित होत गेली. तरीही प्रत्येक कला व केवळ सांगीतिक कला प्रत्येक ठिकाणी एकच रुप वा एकच अर्थ प्रकट करीत नसते याचे मान समर्थांना होते.

समर्थांच्या संगीत विचारात त्यांनी संगीत, नृत्य, नाट्य आणि वाद्यवृंद या चार गोष्टीचा पुरेपूर विचार केलेला दिसतो. किंबहूना त्यांच्या संगीत विचारांच्या या चार पायऱ्याच आपल्याला म्हणाव्या लागतील. तथापि संगीत कलेला श्रेष्ठ स्थान देऊनही प्रत्येक कलेचे सामर्थ्य हे वेगळे असते याची जाण त्यांना होती. त्यामुळेच नृत्यकलेत चपळता, नाट्यकलेत हावभाव, वाद्यात घोष आणि गायनात स्वर व ताल यांचा मेळ त्यांना अभिप्रेत होता. तथापि सर्व कलात गायन कलेला त्यांनी वेळोवेळी गौरविले आहे. अन्यथा

**दास म्हणे जे गायनकळा । आवडीचा जिव्हाळा ।**
**पुण्य परायण सुंदर गायना।**
**विसरी देहभाव ।**

असे उदगार त्यांनी काढलेच नसते.

**आदर्श हनुमंताचा :-**

समर्थ रामदासांना संगीत, नृत्य आणि नाट्य या तिन्ही कलांचा आदर्श रामभक्त हनुमंताच्या व्यक्तिमत्वात पुरेपूर एकवटलेला दिसतो. रामदासांना रामोपासक हनुमान केवळ आडदांड दिसला नव्हता तर तो बुद्धीवंत असा वाटत होता. संगीत परंपरेतील चार मतांपैकी एक मताचा प्रवर्तक असणारा हनुमंत म्हणूनच रामदासांना संगीतज्ञान महंत जाणवला होता.

संगीतविषयक विचार कसा करावा याविषयी रामदासांनी दासबोधात नवविधाभक्ती निरुपणात श्रवण भक्तीचे निरुपण केले आहे. ते याठिकाणी महत्त्वाचे वाटते. ते सांगतात –

**गणगंधर्व विद्याधर**
**यक्ष नारद किन्नर तुंबर**
**अष्टनायका संगीतविचार**
**केसा तो ऐकावा**
**रागज्ञान ताळज्ञान,**
**नृतज्ञान, वाद्यज्ञान**
**अमृतवेळ प्रसंगज्ञान ।**
**केसे ते ऐकावे**

ख्यालगायकी महाराष्ट्रत अलीकडच्या काळात प्रचलीत झाली असे म्हणतात. पण रागदारीचेच नव्हे तर ख्यालगायकीचेच उल्लेख रामदासी वाङ्मयात वेगवेगळ्या ठिकाणी सापडतात. यावरुन ख्यालगायकीचा उगम खूप जुना आहे हे सिद्ध होते आणि रामदासाची संगीतविषयक जाण किती खोलवर होती हे ही निश्चित होते. त्याशिवाय आलापी, तान, मान, बोलतान, वाद्यांचे बोल इत्यादी गोष्टी त्यांच्या पदांत कशा आल्या असत्या ?

**वादन कलेचा गौरव : -**

समर्थांनी संगीतात जास्त महत्त्व दिलं ते वादनकलेला ! निरनिराळ्या वाद्यांच्या वाद्यघोषांनी वातावरण भारल्यासारखे होते. बहुदा हेच कारण समर्थांनी वाद्यकलेस दिलेल्या महत्त्वापाठीशी असावे. त्यामुळेच त्यांच्या वेगवेगळ्या पद्यात अनेक वाद्यांचे उल्लेख अगदी वाद्यांच्या बोलांसह आढळतात. कीर्तनात रंग भरण्यासाठी गायनासोबत टाळ–मृदुंग, वीणा यासारख्या वाद्यांचे किती महत्त्वाचे स्थान आहे हे त्यांनी वेळोवेळी सांगितले आहे. त्यावरुन त्यांना या नादब्रह्माची किती आवड होती हेच दिसून येते. त्यामुळे त्यांनी एका पदात तर कथनापेक्षा म्हणजे शब्द आणि त्यातल्या अर्थातून निघणाऱ्या भावापेक्षा नृत्याच्या बोलातून कसा आशय श्रोत्यांना दाखविता येतो, ते सिद्ध केले आहे. ते लिहितात –

**'द्राम द्राम धिकीटका ।**
**द्राम द्राम धिकिटक**
**द्राम द्राम धिकिटका ।**
**थोंगा तग थोंगा शेय**
**आरंभी नाचतसे गणाधीश**
**थाँगी थाँगी धटीकटा ।**
**धोंगी धोंगी धकिटक**
**धोंगी धोंगी धिधीकटा ।**
**ताऽऽ ताऽऽ धिधीकटा**
**थंगा तग थेयादास**

समर्थ रामदासांचे हे लोकविलक्षण संगीतज्ञान, त्यांची संगीतविषयीची आवड, त्याचे त्याविषयीचे पद्यवाङ्मय आणि त्यातील सांगीतिक अधिष्ठान यांचा हवा तसा अभ्यास झालेला दिसत नाही. संगीताचे अमूल्य सामर्थ्य समर्थांना पुरेपूर जाणवले होते आणि म्हणूनच ते इतरांना संगीताविषयक 'धन्य ते गायनी कळा' समजावून दाखवू शकले हे काय वेगळे सांगायला हवे ?

RESEARCH JOURNEY

**संदर्भ ग्रंथ :-**

१. पाच भक्तिसंप्रदाय - र. रा. गोसावी
२. राजगुरू समर्थ रामदास – शं. दा. पेंडसे
३. पाच संतकवी – शं. गोत्र तुळपुळे
४. सामर्थ्ययोगी रामदास – प्रभाकर पूजारी
५. श्री समर्थ आणि समर्थ संप्रदाय - र. रा. गोसावी